आकाशवाणी मुंबई
सायं. 7.00 वाजता
4, ऑगस्ट 2020 – मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- अयोध्येत उद्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राम मंदिराचं भूमीपूजन

- गणपतीसाठी १२ ऑगस्टपर्यंत कोकणात जाता येणार, १० दिवसांचं क्वारंटाइन होणं बंधनकारक

- मुंबईत झालेल्या पावसामुळं ४ जण बेपत्ता ठाण्यात एकाचा मृत्यू

- सुशांत सिंग राजपूत आत्महत्या प्रकरणाशी कुठलाही संबंध नसल्याचं आदित्य ठाकरे यांचं निवेदन

- युपीएससीकडून नागरी सेवा परीक्षेचा निकाल जाहीर

<><><><><>

अयोध्येत राम मंदिराचं उद्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते भूमी पूजन होणार आहे. सुमारे पावणे दोनशे लोक त्यासाठी उपस्थित राहणार आहे. यामध्ये १३५ संत-महंतांचा समावेश आहे. भूमीपूजनासाठी अयोध्येत सजावटीसोबतच कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गर्दी टाळण्यासाठी बॅरिकेट्स लावले आहेत. भूमिपूजनाच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या अनुष्ठानाच्या आजच्या दुसऱ्या दिवशी सहा तासांचं विशेष अनुष्ठान केलं जात आहे. आज सायंकाळी दीपोत्सव साजरा केला जाणार असून शरयू नदीचे घाट सुशोभित करण्यात आले आहेत. दूरदर्शवर या कार्यक्रमाचं थेट प्रक्षेपण केलं जाणार आहे.

अयोध्येत बाहेरच्या व्यक्तींना आधीच परवानगी नाकारण्यात आली आहे. तसेच अयोध्येतही चारपेक्षा जास्त लोक जमा होणार नाही यासाठी खबरदारी घेण्याचे आदेश पोलिसांनी दिले आहेत. शहरातली मंदिरं आणि मशीद सुरु राहणार असून अयोध्येत उद्या भूमिपूजनाशिवाय कुठलाही धार्मिक विधी होणार नाही.

या निमित्तानं राज्यात काही ठिकाणी प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहेत.

<><><><><>

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांना १२ ऑगस्टपर्यंत कोकणात जाता येणार आहे. ICMR च्या निकषांप्रमाणे क्वारंटाईनचा कालावधी १० दिवस करण्यात आला असून १२ ऑगस्टनंतर कोकणात जाणाऱ्यांनी स्वब टेस्ट करणे बंधनकारक असणार आहे, असं परिवहन मंत्री अनिल परब यांनी म्हटलं आहे. यासाठी एसटीने देखील ३ हजार बसेस तयार ठेवल्या असून त्यासाठी ग्रुप बुकिंग करता येणार आहे. ग्रुप बुकिंग केलेल्यांना त्यांच्या गावापर्यंत सोडण्याची सोय करण्यात आली आहे. यंदा एसटी ५० टक्के

प्रवासी क्षमतेनं चालवण्यात येणार असूनदेखील त्यासाठी कोणतेही अतिरिक्त भाडे आकारण्यात येणार नाही. एसटीने जाणाऱ्या चाकरमान्यांना कोणत्याही इ-पासची गरज भासणार नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं. कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांनी यंदा नियम पाळून गणेशोत्सव साजरा करावा असं आवाहन त्यांनी केलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचं थकलेलं वेतन लवकरच दिलं जाईल अशी माहिती परिवहन मंत्री अनिल परब यांनी ट्विटरवरून दिली आहे. महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना मे महिन्यात केवळ पन्नास टक्के वेतन दिलं होतं, तसंच जून महिन्याचं वेतन अजूनही मिळालेलं नाही. यासंदर्भात आज उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीत महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी ५५० कोटी रुपयांच्या निधीला मान्यता देण्यात आली आहे, अशी माहिती परब यांनी ट्विटरवरून दिली आहे.

**<><><><><>**

मुंबईसह राज्याच्या अनेक भागात काल आणि आज दमदार पाऊस पडला. मुंबईत रात्रीपासून कोसळलेल्या संततधार पावसामुळे सखल भागात पाणी साठून वाहतूक व्यवस्था कोलमडली. हिंदमाता, दादर टिटी, कुर्ला, माटुंगा, गव्हाणपाडा, चेंबूर,अंधेरी अग्निशमन केंद्र, वर्सोवा, दहिसर, बोरिवली, धारावी, वरळी, कांदिवली इत्यादी ठिकाणी पाणी भरलं. पाणी भरल्यानं दादर हिंदमाता, किंग्ज सर्कल, प्रतिक्षनगर, चेंबूर नाका, बांद्रा, शीव या भागातली वाहतूक दुसऱ्या मार्गानं वळवावी लागली.

मिठी आणि पोयसर नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली, त्यामुळे नदीलगतच्या वस्त्यांमधल्या नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवलं.

अत्यावश्यक काम असल्याशिवाय घराबाहेर पडू नये, समुद्रकिनारे तसंच पाणी भरलेल्या ठिकाणापासून लांब राहावं, असं आवाहन पालिकेनं केलं आहे.

पाण्याची पातळी ओसरु लागल्यावर पश्चिम रेल्वेन दुपारी बाराच्या सुमाराला उपनगरी सेवा सुरु केली. मध्य रेल्वेनं लांब पल्ल्याच्या काही गाड्यांच्या वेळा बदलल्या आहेत. मध्य रेल्वेची बंद पडलेली उपनगरी सेवा दुपारी तीनच्या सुमाराला पुन्हा सुरु झाली. हार्बर लाईनची सेवाही चारच्या सुमाराला सुरु झाली.

**पालघर** जिल्ह्यात आज सकाळपासून बोईसर, धनानीनगर, पालघर , सातपाटी, डहाणू , बोर्डी, चिखले, विक्रमगड, वसई - विरार, नालासोपारा या भागांत पावसानं जोरदार वाऱ्यांसह हजेरी लावली. अनेक ठिकाणच्या सखल भागांत रस्त्यांवर पाणी साचलं आहे. काही ठिकाणी झाडं कोसळली.

मुसळधार पावसाचा फटका पालघर महावितरण विभागालाही बसला. 55 वीज वाहिन्यांमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यानं सुमारे अडिच लाख ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित झाला होता. 27 वीज वाहिन्यांचा वीजपुरवठा सुरळीत झाला असून उर्वरित 28 वीज वाहिन्यांचा वीज पुरवठा सुरू करण्याचं कामं सुरू आहे. पाऊस आणि वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी झाडं वीज वाहिन्या वर पडल्यानं महावितरण चे लघु दाब वाहिनीचे 16 पोलचं नुकसान झालं

**रत्नागिरी** जिल्ह्यात काल रात्रीपासून सुरू झालेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळित झालं आहे. सर्वच नद्या दुथडी भरून वाहत आहेत. तर, जगबुडी, वाशिष्ठी, काजळी, अर्जुना आणि कोदवली नद्यांनी

धोक्याची पातळी ओलांडली . त्यामुळे खेड, चिपळूण आणि राजापूर शहरांना पुराचा वेढा बसला. रत्नागिरी शहरात मुसळधार पावसाचा वीजपुरवठ्यावर परिणाम झाला. तालुक्यातल्या चांदेराई बाजारपेठेत सकाळीच पुराचं पाणी शिरलं. त्यामुळे काजळी नदीच्या किनारपट्टीवरच्या २७ दुकानांमध्ये पाणी भरलं. पावसाचा जोर अजूनही कायम असल्यानं पूरस्थितीत लगेच सुधारणा होण्याची शक्यता कमी आहे.

<><><><><>

मुंबईत गोराई इथं आज एक नाव समुद्रात उलटली. त्यातल्या १३ पैकी ११ मच्छिमारांना वाचवलं असून दोनजण बेपत्ता असल्याचं पोलिसांनी सांगितलं. गोराई किनाऱ्यापासून १२ किलोमीटर आत असताना जोरदार पावसाच्या तडाख्यानं ही नाव उलटली. मात्र त्यांच्यापासून जवळ असलेल्या दुकऱ्या एका नावेतल्या लोकांनी पाण्यात उड्या घेऊन या नावेतल्या ११ जणांना वाचवलं. इतर दोघांचा शोध सुरु आहे. ती नावही अजून सापडलेली नसल्याचं पोलिसांनी सांगितलं.

मुंबईत आज झालेल्या मुसळधार पावसात सांताक्रूज इथं एक महिला आणि तिची दोन मुलं नाल्यात वाहून गेली. धोबिघाट इथं आज सकाळी ही दुर्घटना झाली. नाल्याजवळच असलेलं या महिलेचं घर पावसानं कोसळलं, आणि मुलांसह ती या नाल्यात पडून वाहून गेली. पोलिसांनी तिच्या दोन वर्षांच्या मुलाला वाचवलं आहे. नंतर अग्निशमन दलाचे जवानही तिथं पोचले आणि इतर दोघांना शोधण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरु केले. राष्ट्रीय आपत्ती प्तिसाद दल आणि इतरही दलांचे कर्मचारी या शोध मोहिमेत सहभागी झाले असल्याचं अधिकाऱ्यांनी सांगितलं.

ठाण्यात घोडबंदर मार्गावर ओवळा इथं विजेच्या खांबाला धक्का लागून एकाचा मृत्यू झाला.

<><><><><>

मुसळधार पावसामुळे कांदिवली इथं पश्चिम द्रुतगती मार्गावर आज सकाळी दरड कोसळली. त्यामुळे त्या मार्गावरची वाहतूक ठप्प झाली. रस्त्यावरुन ही दरड हटवण्याचं काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारे सुरु आहे. प्राधिकरणाचे अधिकारी आणि कर्मचारी रस्ता मोकळा करण्यासाठी काम करत आहेत.

<><><><><>

मुसळधार पावसामुळे मुंबई उच्च न्यायालयात आज, व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे होणार असलेल्या, विविध प्रकरणांच्या सुनावण्या स्थगित कराव्या लागल्या. त्यात सुशांत सिंग राजपूत आत्महत्या, एल्गार परिषद इत्यादी प्रकरणांचा समावेश होता.  पावसामुळे वाहतूक व्यवस्था ठप्प झाल्यानं उच्च न्यायालयातले अनेक कर्मचारी आज पोचू शकले नाहीत. त्यामुळे आजची सुनावणी स्थगित करुन ती उद्या घेणार असल्याचं न्यायालयानं सांगितलं.

<><><><><>

मृदा(माती) आरोग्य पत्रिका ही योजना देशभरात फेब्रुवारी २०१५  मध्ये सुरु करण्यात आली. या पथदर्शी प्रकल्पात राज्यातील सर्व 351 तालुके निवडण्यात आले. त्यातल्या 351 गावांमध्ये 1 लाख 84 हजार खातेदारांचे 2 लाख 8 हजार माती नमुने तपासण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. यावर्षी अकोला जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातल्या 5 गावांची निवड करून मृद नमुने विनाशुल्क तपासणी केली जाणार आहे. याचा लाभ अकोल्यातले शेतकरी प्रवीण ढगे यांनी घेतला आहे. याविषयी त्यांनी दिलेली प्रतिक्रिया आता ऐकूया.......

<><><><><>

केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचा लाभ गोंदियातल्या शेतकऱ्यांनाही मिळाला आहे . याविषयी शेतकरी हिरालालटेंभरे यांनी दिलेली प्रतिक्रिया आता ऐकूया.....

<><><><><>

पीक विमा योजनेचाही लाभ गोंदियातले शेतकरी घेत आहे. याविषयी अधिक माहिती देत आहेत प्रगतीशील शेतकरी संजय टेंभरे....

<><><><><>

अभिनेता सुशांतसिंह राजपूत याची आत्महत्या नसून हत्या असल्याचा आरोप भाजप नेते खासदार नारायण राणे यांनी केला आहे. ते आज वार्ताहरांशी बोलत होते. सुशांतच्या मृत्यूपूर्वी त्याच्या घरी झालेल्या पार्ट्यांना कोण कोण हजर होतं, त्याचा तपास करावा, गेल्या काही दिवसांपासून बेपत्ता असलेल्या रिया चक्रवर्तीचा तपास करून चौकशी करावी, अशी मागणी राणे यांनी केली आहे.

राणे यांनी केलेल्या आरोपानंतर पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे यांनीही ट्विटरवर निवेदन प्रसिद्ध करून प्रतिक्रिया दिली आहे. सुशांतसिंग राजपुत आत्महत्या प्रकरणात आपल्यावर तसंच आपल्या कुटुंबावर होत असलेले कथित आरोप म्हणजे वैफल्यातून केलेले राजकीय आरोप आहेत, या प्रकरणाशी आपला कुठलाही संबंध नसल्याचा खुलासा त्यांनी केला आहे. हिंदी चित्रपटसृष्टीतल्या अनेकांशी आपले जिव्हाळ्याचे संबंध आहेत, असे संबंध असणं हा काही गुन्हा नाही, असंही आदित्य ठाकरे यांनी म्हटलं आहे. मुंबई पोलीस सुशांत सिंग याच्या आत्महत्येचा खोलवर तपास करत आहेत, मात्र ज्यांचा कायद्यावर विश्वास नाही असेच लोक, आरोप करत असल्याचंही आदित्य ठाकरे यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, सुशांतसिंह राजपूत मृत्यू प्रकरणाचं राजकारण केलं जात असल्याचा आरोप महाराष्ट्राचे परिवहन मंत्री अनिल परब यांनी केला आहे. ते आज मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. खोटे आरोप करून युवा नेते आदित्य ठाकरे यांची प्रतिमा मलीन केली जात असल्याचा आरोप अनिल परब यांनी केला आहे. या संदर्भात ज्यांच्याकडे पुरावे आहेत, त्यांनी ते समोर घेऊन यावं, असं आवाहन परब यांनी केलं.

दरम्यान, बिहार सरकारने सुशांतसिंह राजपूत मृत्यू प्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभाग - सीबीआयमार्फत तपासणीची शिफारस केली आहे. या प्रकरणाच्या तपासात महाराष्ट्र पोलीस सहकार्य करत नसल्याचा आरोपही बिहारचे मुख्यमंत्री नीतीश कुमार यांनी केला आहे.

<><><><><>

केंद्रीय लोकसेवा आयोगानं, नागरी सेवा परीक्षा २०१९ चे अंतिम निकाल आज जाहीर केले. नागरी सेवांच्या एकूण ९२७ पदांसाठी ही परीक्षा घेण्यात आली होती. निकालानंतर भारतीय प्रशासकीय, परराष्ट्र व्यवहार, आणि भारतीय पोलीस सेवेतल्या विविध पदांसाठी एकूण ८२९ उमेदवारांची निवड करण्यात आली आहे. या निकालात भारतीय महसुल सेवेत अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या प्रदीप सिंग यांनी मुलांमधे पहिला तर,

भारतीय अर्थसेवेत कार्यरत असलेल्या जतीन किशोर यानं दुसरा, तर भारतीय महसुल सेवेत प्राप्तिकर विभागात अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या प्रतिभा वर्मा हिनं मुलींमधे पहिला क्रमांक पटकावला आहे. हा निकाल केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावर पाहता येईल. निकाल जाहीर झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांनंतर गुण जाहीर केले जातील अशी माहिती केंद्रीय लोकसेवा आयोगानं दिली आहे.

आज जाहीर झालेल्या निकालात नांदेड जिल्ह्यामधल्या नायगांव तालुक्यामधल्या शेळगांव-गौरी गावाच्या योगेश बावणे यांनी ६३ वा क्रमांक मिळवला आहे. अहमदनगर जिल्ह्यामधल्या, जामखेड तालुक्यातल्या मोहरी गावच्या महेश बाळासाहेब गीते यानंही या निकालात ३९९ वा क्रमांक मिळवला.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी अभिनंदन केलं आहे.

<><><><>

देशात आतापर्यंत कोरोना संक्रमणातून बरे झालेल्या रुग्णांची एकूण संख्या १२ लाख ३० हजार ५०९ झाली आहे. ही संख्या सध्या कोरोना संक्रमणावर उपचार घेत असलेल्या रुग्णांच्या संख्येपेक्षा दुप्पट आहे. सध्या देशात पाच लाख ८६ हजार २९८ रूग्ण उपचार घेत आहेत. दरम्यान, देशात गेल्या २४ तासात देशात कोविड १९ चे एकूण ५२ हजार ५० नवे रूग्ण आढळले, तर ४४ हजार ३०६ रुग्ण बरे झाले असल्याची माहिती आरोग्य मंत्रालयाकडून दिली. देशात सध्या या विषाणूने बाधित रुग्णांची एकूण संख्या १८ लाख ५५ हजार ७४५ झाली आहे.

देशात गेल्या २४ तासांत कोविड १९ च्या सहा लाख ६१ हजार ८९२ नमून्यांची चाचणी झाली. ही संख्या आतापर्यंत केलेल्या चाचण्यांच्या संख्येपैकी सर्वात जास्त आहे. आतापर्यंत देशात कोविड-१९ च्या दोन कोटी आठ लाख ६४ हजार चाचण्या झाल्या आहेत. सध्या देशात या चाचण्यांसाठी एक हजार ३५६ प्रयोगशाळा असून, यापैकी ९१७ प्रयोगशाळा सरकारी तर ४३९ प्रयोगशाळा खाजगी असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

<><><><>

राज्यात काल 10 हजार 221 रुग्ण कोरोनामुक्त होऊन घरी गेले. राज्यात आतापर्यंत कोरोनाचे 2 लाख 87 हजार 20 रुग्ण बरे झाले असून बरे होण्याचं प्रमाण 63 पूर्णांक 76 शतांश टक्के आहे, तर 8 हजार 969 नवे कोरोनाबाधित रुग्ण आढळले. काल दिवसभरात आढळलेल्या नव्या कोरोना बाधितांपेक्षा उपचारानंतर बरे होऊन घरी गेलेल्या रुग्णांची संख्या जास्त आहे. राज्यात आतापर्यंत एकंदर 4 लाख 50 हजार 196 कोरोना बाधित आढळले असले तरी सध्या 1 लाख 47 हजार 18 रुग्णांवरच विविध रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत. काल कोविड 19 च्या 266 रुग्णांच्या मृत्यूंची नोंद झाल्यामुळे आतापर्यंत राज्यात या रोगामुळे दगावलेल्यांची संख्या 15 हजार 842 झाली आहे. राज्यात सध्या 9 लाख 25 हजार 269 जण घरी, तर 37 हजार 944 जण संस्थात्मक विलगीकरणात आहेत. राज्याचा मृत्यूदर 3 पूर्णांक 52 शतांश टक्के इतका आहे.

<><><><>

ज्येष्ठ रंगकर्मी आणि थोर नाट्यशिक्षक इब्राहिम अल्काजी यांचं आज नवी दिल्ली इथं हृदयविकाराच्या धक्क्यानं निधन झालं ते ९४ वर्षांचे होते. NSD अर्थात राष्ट्रीय नाट्य शाळेचे संचालक म्हणून त्यांनी दीर्घकाळ काम केलं. गिरीश कर्नाड यांचं तुघलक, धर्मवीर भारतीचं अंधा युग,यासारख्या नाटकांची निर्मिती त्यांनी केली. नातीरुद्दीन शाह, ओम पुरी यांच्यासारखे अनेक उत्कृष्ट नट त्यांनी घडवले.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीमुळे आज पुर्वोत्तरच्या राज्यांची प्रगती होत आहे, असं मत केंद्रीय माहिती आणि प्रसारणमंत्री प्रकाश जावडेकर यांनी आज व्यक्त केलं. आसाम च्या 24 तास चालणाऱ्या नव्या दूरदर्शन वाहिनीचं व्हीडीओ कॉँफरंसींगच्या माध्यामातून उदघाटन केल्यानंतर ते बोलत होते.  आसामला स्वत:ची नवी दूरदर्शन वाहीनी असणं गरजेचं होतं, दुरदर्शनच्या 104 वाहीन्या मोफत आहेत नागरीकांनी त्याचा आनंद घ्यावा, असंही ते  म्हणाले.

//<><><><><>//